# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष २ रे ❑ अंक ६ वा ❑ भारतीय सौर दिनांक १६ माघ शके १९४७, गुरूवार दि.०५ फेब्रुवारी २०२६ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## विशेष लेख...

### तिसरे अपत्य कायदा स्थानिक निवडणुकीसाठी जीवघेणा ठरत आहे!

– प्रा डॉ सुधीर अग्रवाल

ज्योतिर्मय साहित्य

दोनपेक्षा अधिक अपत्य असलेल्यांना स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढता येत नाही, असा कायदा असताना आता हा कायदा जीवघेणा ठरत आहे.

नांदेडमधील मुखेड तालुक्यात ग्रामपंचायत निवडणुकीत सरपंच पदाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पांडुरंग बाबुराव कोंडमंगले (वय ३२) या पित्याने आपल्या ७ वर्षांच्या मुलीला तेलंगणातील कॅनॉलमध्ये फेकून दिल्याची धक्कादायक घटना घडली आहे .तीन अपत्ये असल्याने निवडणूक लढवण्यात अडसर निर्माण होऊ नये म्हणून त्याने पोटच्या मुलीचा बळी घेतला. तो पत्नीला साहित्य खरेदीच्या बहाण्याने मुलीला घेऊन गेला आणि कट्टापल्ली परिसरातील कॅनॉलमध्ये तिला फेकून, नंतर एकटाच परत आला.

सरपंच पदाच्या निवडणुकीसाठी तीन अपत्ये अडसर ठरत होती, त्यामुळे दोन अपत्य नियमात बसण्यासाठी हे कृत्य केल्याचे बोलले जात आहे.ही घटना फेब्रुवारी २०२६ च्या सुरुवातीची आहे, जिथे बाऱ्हाळी येथील सलोन व्यावसायिक पांडुरंग कोंडामंगले याने आपली मुलगी प्राचीला ठार मारले.

आगामी ग्रामपंचायत निवडणुकीत पांडुरंग कोंडामंगले हा सरपंच पदाचा उमेदवार म्हणून निवडणुकीच्या रिंगणात उतरण्याची तयारी होती. पण, त्याला तीन अपत्य होती. नियमानुसार, तीन अपत्य असल्यास निवडणूक लढवता येत नाही. निवडणुकीत तिसरे अपत्य अडसर ठरु नये म्हणून पित्यानंच तिचा बळी घेतला.

सरपंचाचा सैतानी सल्ला आणि कट

पांडुरंगचा मित्र आणि गावचा विद्यमान सरपंच गणेश शिंदे याने त्याला वारंवार टोमणे मारले की, ''तुला तीन मुले आहेत, त्यामुळे तू निवडणूक लढवू शकणार नाहीस.'' सुरुवातीला पांडुरंगने पुणे महानगरपालिकेत जाऊन आपल्या जुळ्या मुलींच्या जन्म दाखल्यात फेरफार करण्याचा आणि पित्याचे नाव बदलण्याचा प्रयत्न केला, पण त्यात तो अपयशी ठरला. त्यानंतर मुलीला दत्तक देण्याचाही विचार झाला. मात्र, जेव्हा काहीच मार्ग उरला नाही, तेव्हा सरपंच गणेश शिंदे आणि पांडुरंग यांनी मिळून एका मुलीचा काटा काढण्याचे भयानक षडयंत्र रचले.

लहान कुटुंब, सुखी कुटुंब हा विचार केवळ कागदावर न राहता त्याला प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्य सरकारने कायदा केला. त्यानुसार सप्टेंबर २००१ नंतर झालेल्या अपत्यामुळे एकूण अपत्यांची संख्या दोनपेक्षा अधिक झाल्यास किंवा आधीच दोनपेक्षा अधिक असलेल्या अपत्यांच्या संख्येत १२ सप्टेंबर २००१ नंतर भर पडल्यास अशा व्यक्ती स्थानिक स्वराज्य संस्थांची निवडणूक लढण्यास अपात्र ठरतात. यावर निवडणूक आयोगाचे बारीक लक्ष आहे.

दरम्यान, सत्तेची हाव माणसाला इतकी आंधळी करते की, तो स्वतःच्या रक्ताच्या नात्याचाही विचार करत नाही, हे या घटनेवरून स्पष्ट होते. एका चिमुरडीचा बळी घेणारे हे राजकारण खऱ्या अर्थाने समाजासाठी घातक आहे.

लोकसभा व विधानसभेसाठी तीन अपत्याची अट लागू नाही. तीन अपत्य असलेल्या दाम्पत्यांना निवडणूक लढता येते.मात्र स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीत तीन अपत्य असणारे अपात्र ठरतात, ,असे का? तर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुक कायदा राज्य सरकारने केला असून विधानसभा व लोकसभेच्या निवडणुक कायदा संदर्भातील तरतूद घटनेत असून हा कायदा केंद्र सरकारने व भारतीय निवडणूक आयोगाने केला आहे.

स्थानिक कायदा राज्या पुरता सिमित असला तरी या कायद्यात दुरुस्ती करणे आवश्यक आहे.केंद्राचा कायदा वेगळा व राज्याचा कायदा वेगळा.ही विसंगती घटनेतील समता या तत्वाच्या विरुद्ध असून राज्य सरकारने केंद्र सरकार प्रमाणेच कायदा करून तीन अपत्याची अट शिथिल करावी.लहान कुटुंब, सुखी कुटुंब हा विचार केवळ कागदावर न राहता त्याला प्रोत्साहन मिळावे यासाठी राज्य सरकारने कायदा केला. हेच तत्व लोकसभा विधानसभेसाठी देखील लागू करायला पाहिजे.

# छ. संभाजीनगर येथे अखिल भारतीय वैद्यकीय साहित्य-संस्कृती संमेलन

## विचारवंत व लेखक मंगेश हाडवळे यांच्याशी संवाद तसेच प्रसिद्ध लेखक अरविंद जगताप यांची मुलाखत

ज्योतिर्मय साहित्य

छत्रपती संभाजीनगर : अभिमान मराठीचा-भाषा, सेवा, संस्कृतीचा' या संकल्पनेवर आधारित अखिल भारतीय वैद्यकीय साहित्य-संस्कृती संमेलन दि. १४ व १५ फेब्रुवारी २०२६ रोजी छत्रपती संभाजीनगर येथे आयोजित करण्यात आले आहे. हे संमेलन एफ. आर.टी. इंजिनिअरिंग कॉलेज, बीड बायपास रोड येथे होणार आहे. संमेलनाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा, लेखक संमेलन, गझल-ए-रुबेरी मराठी गझल संमेलन व काव्यसंमेलनाचे आयोजन करण्यात आले आहे. सायंकाळी 'माकडाच्या हाती शेगडी' या विनोदी



मराठी नाटकाचे सादरीकरण होणार आहे. या दिवशी जिल्हाधिकारी मा. श्री. दिलीप स्वामी, शिक्षणाधिकारी मा. अरविंद लाडकर, सुप्रसिद्ध गझलकार मा. प्रभा चव्हाण, साहित्य अकादमी सदस्य मा. नरेंद्र पाटील यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

दुसऱ्या दिवशी विविध वैचारिक व साहित्यिक सत्रे पार पडणार असून, सुप्रसिद्ध विचारवंत व लेखक मा. मंगेश हाडवळे यांच्याशी संवाद तसेच प्रसिद्ध लेखक मा. अरविंद जगताप यांची मुलाखत आयोजित करण्यात आली आहे. संमेलनाचे उद्घाटन सुप्रसिद्ध कादंबरीकार मा. विश्वास पाटील यांच्या हस्ते होणार असून, यावेळी डॉ. जवाहर पटेल (बालरोगतज्ज्ञ व विचारवंत) यांची उपस्थिती राहणार आहे. संमेलनस्थळी ग्रंथदालन, कलादालन, वस्त्रनमुने दालन तसेच 'खाऊ गल्ली' हे विशेष आकर्षण असणार आहे. वैद्यकीय क्षेत्रातील डॉक्टर, साहित्यिक, विद्यार्थी व मराठीप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संमेलनाचे अध्यक्ष डॉ. अनिल टाकळकर, सचिव डॉ. गणेश लहाने व समन्वयक डॉ. शेखर मोरे यांनी केले आहे.

# भारत अमेरिका विन विन ट्रेड डीलचा चमत्कार : मिथक आणि वास्तव

ज्योतिर्मय साहित्य




बहुचर्चित आणि प्रलंबित राहिलेला भारत अमेरिका व्यापार करार सोमवारी २ फ ेब्रुवारी रोजी घोषित झाला. त्याचे वर्णन विन विन ट्रेड डील असे करण्यात येत आहे या करारामुळे दोन्ही लोकशाही राष्ट्रांची होत असलेली कोंडी मोकळी झाली असून आता उभय राष्ट्रातील आर्थिक आणि बहुआयामी संबंधांना एक नवे वळण लाभत आहे. हे वळण निश्चितच सकारात्मक आणि रचनात्मक आहे त्याची मिमांसा केली असता असे दिसते की उभयपक्षी या करारामुळे अनेक विविध लाभ अपेक्षित आहेत. विशेषतः जेव्हा आर्थिक संबंध ताणले जातात तेव्हा त्याचे दुर्गामी परिणाम शैक्षणिक सांस्कृतिक आणि भूराजनैतिक अशा अनेक पैलूवर होतात हे लक्षात




घेऊन जागतिक शांतता सुख आणि समृद्धीसाठी दोन्ही देशांमध्ये व्यापार करार अंतिमतः नव्या आकारात आला आहे आणि त्याची फलश्रुती अनेक दृष्टीने बहुचर्चित असली तरी त्यातील सूक्ष्म लाभाचे साधक बाधक विश्लेषण करणे अपरिहार्य ठरते.

ऐतिहासिक व्यापार करार

भारत रशियाकडून कच्च्या तेलाची आयात करतो त्यामुळे त्याला युक्रेन विरुद्ध लढण्यासाठी बळ प्राप्त होते हे सूत्र घेऊन भारतावर प्रथम पंचवीस टक्के आणि नंतर ५० टक्के टेरिफ लादण्यात आला पण भारताने अत्यंत काळजीपूर्वक व्युव्हरचनात्मक डावपेच आखून युरोप आशिया व आफ्रिका खंडातील अनेक देशांशी मुक्त व्यापार करार केले. त्यामुळे भारताचा आर्थिक व्याप अधिक वाढला आणि भारत मोठ्या जोमदारपणे जागतिक व्यापारात पदार्पण करत आहे असे लक्षात आल्यानंतर डोनाल्ड ट्रम्प यांनी काढता पाय घेतला आणि त्यांनी नरमाईचे धोरण स्वीकारले. ट्रम्प का नरमले याची दोन कारणे आहेत पहिले म्हणजे अमेरिकेतील जनतेकडून भारताशी मैत्री करार एका लोकशाही राष्ट्राची शत्रुत्व आणि त्याच्या शेजारी दहशतवादी राष्ट्राची मैत्री कशी होते यावर अमेरिकन प्रसारमाध्यमांनी जोरदार टीका केली. खुद्द रिपब्लिकन पक्षातील ज्येष्ठ खासदारांनी सुद्धा त्यावर जाहीर नापसंती व्यक्त केली होती हे सर्व टाळण्यासाठी भारताशी स्नेहसंबंध निर्माण करणे आवश्यक झाले होते, दुसरे म्हणजे भारत जगातील तिसऱ्या क्रमांकाची अर्थव्यवस्था होण्याच्या दिशेने आगेकुच करत आहे. एक लोकशाही देश जो अमेरिकेच्या मदतीने स्वतंत्र झाला, त्याला मदत करणे म्हणजे लोकशाही शक्तीचे ध्रुवीकरण करणे होय. असा युक्तिवाद केला जात होता परिणामी अमेरिकेतील वाढता आर्थिक तणाव आणि वाढती महागाई आणि अनेक जीवनावश्यक वस्तूंच्या किमतीमध्ये झालेली वाढ पाहता आशियातून येणाऱ्या वस्तूंचा व्यापार खुला करणे अपरिहार्य झाले होते हा व्यापार करार ऐतिहासिक आहे कारण प्रथम युरोपातील देशांनी युरोपियन युनियन या प्रमुख संघटनेसह दोन्ही गटाने भारताबरोबर मुक्त आर्थिक व्यापार करार केल्यामुळे आता अमेरिकेला भारताशी आर्थिक सहकार्यास हात पुढे करण्याशिवाय कुठलाही दुसरा मार्ग उरला नव्हता भारताच्या वाढत्या आर्थिक प्रभुत्वाचे हे एक प्रमुख लक्षण होय असे प्रामुख्याने जगभरातून नोंदविले जात आहे.

टेरिफ कपातीचे संभाव्य लाभ

अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प महोदयांनी टेरिफ कपातीचा निर्णय घोषित केला त्यामुळे भारतीय शेअर बाजार आणि उद्योगपतींनी मोठा सुस्कारा टाकला. त्याचे कारण म्हणजे या टेरिफ कपातीचे संभाव्य सकारात्मक परिणाम हे होय. एक मोठी करायचं डोनाल्ड ट्रम्प यांनी शुल्क वाढीच्या तलवारीची धार बोथट का केले, कशी केली, किती केली हे लक्षात घेण्यासारखे आहे. त्यांनी केलेल्या घोषणा नुसार भारतीय उत्पादनावरील सर्व शुल्क ५० टक्के वरून १८% पर्यंत कमी केले आहेत. तसेच भारत आता यापूर्वी लागलेला पंचवीस टक्के परस्पर कर आणि रशियाकडून तेल खरेदी वर लादलेला २५% दंडात्मक कर काढून टाकण्यात आला आहे. या दुहेरी सवलतीचे लाभ भारतीय अर्थव्यवस्थेतील मंदी कमी होऊन तेजीकडे वाटचाल करण्यास सकारात्मक होणार आहेत. भारताने अमेरिकेला दिलेले वचन अर्थपूर्ण आहे, अमेरिकेच्या वस्तूवरील कर आणि नॉन टेरिफ अडथळे हळूहळू शून्य पर्यंत कमी करण्याची तयारी भारताने दाखविली आहे.

अमेरिकन खाद्यपदार्थ आयात करताना जैविक रसायनापासून बनविलेले खाद्य अन्नास स्वदेशी जागरण मंचने विरोध केला आहे. तो अर्थपूर्ण आहे, शिवाय भारतीय शेतकरी व दुग्ध व्यवसायाचे हितरक्षण प्राधान्याने केले पाहिजे. तसे ते केले आहे असे पियुष गोयल म्हणतात. भारताची धोरणात्मक पावले या दिशेने टाकली जाणार आहेत. या आश्वासनामुळे ट्रम्प महोदय प्रसन्न झाले आणि त्यांनी कपातीचा निर्णय घोषित केला. डोनाल्ड ट्रम्प यांच्या टेरिफ वाढीचा बागुलबुवा पाहता भारताला एक पाऊल पुढे टाकण्यासाठी एक पाऊल मागे येणे भाग होते आणि मोठ्या चतुराईने मोदी यांनी हा निर्णय घेऊन भारतीय अर्थव्यवस्थेतील शैठील्य दूर केले आहे.

(क्रमशः)

# दादा लाड, भारतभूषणदासजी महाराज यांना जनकल्याण समितीचा 'श्रीगुरुजी पुरस्कार' जाहीर

ज्योतिर्मय साहित्य



पुणे - शेतीभूषण श्रीरंग देवबा लाड (दादा) आणि वाराणसीचे आचार्य श्री महंत भारतभूषणदासजी महाराज यांना यंदाचा 'पूजनीय श्रीगुरुजी पुरस्कार' जाहीर करण्यात आला आहे. 'राष्ट्रीय स्वयंसेवक संघ जनकल्याण समिती'तर्फे प्रतिवर्षी हा पुरस्कार प्रदान केला जातो. पुण्यात शनिवारी, १४ फेब्रुवारी रोजी आयोजित कार्यक्रमात हे पुरस्कार प्रदान केले जातील.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे द्वितीय सरसंघचालक मा. स. गोळवलकर उपाख्य श्रीगुरुजी यांच्या जयंतीदिनानिमित्त हा पुरस्कार दिला जातो. या राष्ट्रीय पुरस्काराचे यंदा ३१ वे वर्ष आहे. 'जनकल्याण समिती'चे कार्यवाह राजन गोऱ्हे यांनी बुधवारी पत्रकार परिषदेत या पुरस्कारांची घोषणा केली. सन्मानपत्र, सन्मानचिन्ह आणि एक लाख रुपये असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. अनुसंधान क्षेत्रासाठीचा पुरस्कार लाड यांना आणि समाजप्रबोधन क्षेत्रासाठीचा पुरस्कार भारतभूषणदासजी महाराज यांना प्रदान केला जाईल, असे गोऱ्हे यांनी सांगितले.

प्रसिद्ध उद्योगपती डॉ. अभय फिरोदिया कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहणार आहेत. संघाचे सरकार्यवाह दत्तात्रेयजी होसबाळे कार्यक्रमाचे प्रमुख वक्ते आहेत. पुरस्कार प्रदान समारंभ शनिवार, १४ फेब्रुवारी रोजी सायंकाळी सहा वाजता सिम्बायोसिस विमाननगर येथील एसव्हीसी सभागृहामध्ये होईल.

दादा लाड यांनी कापूस उत्पादनाच्या वाढीसाठी केलेले संशोधन लक्षणीय असून त्यांच्या दादा लाड तंत्रज्ञान संशोधनाला भारतीय कृषी संशोधन परिषेदेनेही (आयसीएआर) मान्यता दिली आहे. ज्वारी, गहू, सोयाबीन आणि तूर लागवड तसेच उत्पादन वाढीसाठीही लाड यांनी महत्त्वपूर्ण संशोधन केले आहे. लाल कंधारी प्रजातींच्या देशी गायींचा प्रसार हा त्यांच्या कार्याचा आणखी एक महत्त्वाचा पैलू आहे.

आचार्य श्री महंत भारतभूषणदासजी महाराज यांचे समाजप्रबोधनाचे कार्य गेली अनेक वर्षे सुरू असून प्रामुख्याने उत्तर प्रदेश, छत्तीसगड, मध्य प्रदेश, झारखंड, ओरिसा, राजस्थान, गुजरात, पंजाब, हरियाणा, दिल्ली आदी राज्यांमध्ये संत गुरु रविदास यांनी दिलेला संदेश जनमानसापर्यंत पोहोचवून समाज जोडण्याचे त्यांचे कार्य लक्षणीय आहे. समाजातील भेदभाव, कुरीती संपाव्यात यासाठी भारतभूषणदासजी महाराज प्रबोधनाचे कार्य सातत्याने करत आहेत.

पुणेकर नागरिकांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहून दादा लाड आणि आचार्य श्री महंत भारतभूषणदासजी महाराज यांच्या कार्याला प्रोत्साहित करावे, असे आवाहन 'जनकल्याण समिती'तर्फे करण्यात आले आहे. संस्थेचे सहकार्यवाह मुकुल पाटगावकर यांनी प्रास्ताविक केले.राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रांत प्रचार प्रमुख अतुल अग्निहोत्री,संस्थेचे कार्यकारिणी सदस्य विनायक डंबीर यांची प्रमुख उपस्थिती होती.

जनकल्याण समिती'ची सेवाकार्ये

'जनकल्याण समिती'तर्फे महाराष्ट्रात आपत्ती व्यवस्थापन, आरोग्य, शिक्षण, पूर्वांचल विकास, दिव्यांग कल्याण या पाच प्रमुख क्षेत्रात सतरा मोठे सेवा प्रकल्प चालवले जात आहेत. त्यात प्रामुख्याने आठ शहरांमध्ये पूर्वांचल वसतिगृह प्रकल्प, रुग्णालय, आरोग्य सल्ला, समुपदेशन, रुग्ण सेवा, तीन रक्तकेंद्र, पुण्यातील सेवा भवन, सेरेब्रल पाल्सी विकसन केंद्र, सिकल सेल आणि थॅलेसेमिया प्रकल्प, दिव्यांगांसाठी औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तसेच तीन जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र आदी सेवाकार्यांचा समावेश आहे.







## जात्यावरच्या ओव्या......

कोड्यातून सांगे
बाबा नातवाला,
कोरड्या विहिरीत
चोर बोंबलला ||४८२||

नातू म्हणे बाबा
करू द्या विचार
शेपटीने पाणी पिते
दिव्याची वात थोर ||४८३||

©® सौ. मनोरमा बोराडे
छत्रपती संभाजी नगर
मो. 70207 33758

## ये दिल मांगे ( नो ) मोअर...




विश्वास देशपांडे
चाळीसगाव
मो.९४०३७४९३९२

ज्योतिर्मय साहित्य

शीतपेयांमध्ये बीव्हीओ चा वापर केला जातो. बीव्हीओ म्हणजे ब्रोमिनेटेड व्हेजिटेबल ऑइल. ज्या शीतपेयांमध्ये फळांच्या स्वादाचा वापर केला जातो, अशा पेयांच्या टिकावूपणासाठी ब्रोमाइडचा वापर केला जातो. ब्रोमाइड या द्रव्याचा वापर अग्निशामक दलाकडून वापरल्या जाणाऱ्या पदार्थात आग विझवण्यासाठी केला जातो. बीव्हीओ युक्त पदार्थांचे अधिक सेवन केल्याने आरोग्यावर विपरीत परिणाम होऊन स्मृतिभ्रंश, त्वचाविकार जडू शकतात असे अमेरिकेतील मेयो क्लिनिक च्या संशोधकांनी केलेल्या संशोधनातून स्पष्ट झाले आहे.





याशिवाय शीतपेयांमध्ये कॅफिन, कार्बन डाय ऑक्साईड, अल्युमिनियम इ घटकांचा वापर केला जातो. हे सगळे घटक आरोग्याच्या दृष्टीने घातकच आहेत हे आपण जाणतो. शिवाय बऱ्याचशा शीतपेयांमध्ये साखरेचा प्रचंड प्रमाणात वापर केला जातो. त्यामुळे शरीरात अनावश्यक प्रमाणात साखर जाते. बऱ्याच शीतपेयांमध्ये गोडी येण्यासाठी कृत्रिम स्वीटनर वापरले जाते. त्यामुळे वजनात, लठ्ठपणात वाढ होते. जास्त भूक लागते. त्यामुळे जास्त कॅलरीज आपल्याकडून घेतल्या जातात. शिवाय त्यातील कृत्रिम रंगांच्या वापरामुळे ऍलर्जी होऊन त्वचाविकारात वाढ होते. शीतपेये थंड राहावीत म्हणून त्यात इथिलिन ग्लायकॉलचा वापर करण्यात येतो. या रसायनाचा वापर कार कूलंट म्हणून केला जातो. शरीरात जास्त प्रमाणात गेल्यास ते कॅन्सर सारखे आजार उत्पन्न करू शकते.

बरे या शीतपेयांची निर्मिती करणाऱ्या मोजक्या भारतीय कंपन्या सोडल्या तर बहुतेक कंपन्या विदेशी आहेत. या कंपन्या मध्यमवर्गीय आणि कमी उत्पन्न असणाऱ्या लोकांना आणि देशांना आपले लक्ष करतात. या देशांतील अफाट लोकसंख्येमुळे या कंपन्यांना प्रचंड मोठी बाजारपेठ उपलब्ध आहे. राजीव दीक्षित यांनी एकदा आपल्या भाषणात सांगितले होते की दरवर्षी पेप्सी, कोका कोला या कंपन्यांच्या माध्यमातून पाच हजार सातशे कोटी रुपये भारतातून अमेरिकेत जातात. ही आकडेवारी साधारणपणे पंधरा वर्षांपूर्वीची आहे. आजच्या घडीला त्यात प्रचंड वाढ नक्कीच झाली असणार. एवढा पैसा जर भारतातच खर्च केला तर भारत सरकार सगळ्या गावांना पिण्याचे शुद्ध आणि मुबलक पाणी पुरवू शकेल. **(क्रमशः)**




## मनात आले की भगवंताची आठवण करावी



श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज

ज्योतिर्मय साहित्य

'भगवंता, माझा भोग बरा कर,' असे आपण जर त्याला म्हटले नाही, तर त्याच्या स्मरणाची जाणीव आपल्याला होईल. भगवंताच्या स्मरणात आनंद आहे. आनंदाची जाणीव झाली की दुःखाची जाणीव कमी होईल. अनुसंधानाने जे काय साधायचे ते हेच. भगवंताच्या आड येते त्याची पर्वा करू नये. भिक्षा मागण्याचा जरी प्रसंग आला तरी भगवंताचे अनुसंधान सोडू नये. घरादाराला रात्रीच्या वेळी आपण पहारा ठेवतो, चोर येतील त्या वेळेस सावध राहातो, तसेच संधीच्या वेळेस भगवंतापासून दूर होऊ नये म्हणजे झाले. वेळेला सावध राहाणे ज्याला साधत नसेल त्याने अखंड सावध राहावे. विषय मनात आले की तिथे भगवंताची आठवण ठेवून द्यावी. ' अंते मतिः सा गतिः ' अशी आपल्यात म्हण आहे. जन्मात जे केले नाही ते मृत्यूच्या वेळेला कसे आठवता येईल ? एवढ्याकरिता भगवंताच्या अखंड स्मरणात राहावे. भगवंताचे नाम हे औषध समजावे; भगवंताची प्राप्ती हे त्याचे फल. औषध मात्र थेंब थेंब आणि सतत पोटात गेले पाहिजे. नामस्मरण जर शेवटपर्यंत चालू राहिले तर तो 'योगच' आहे; आणि त्या 'एकाशी' योग साधणारा तो योगी समजावा.

एकच ठिणगी सबंध कापसाचा नाश करायला समर्थ असते, त्याप्रमाणे भगवंताचे नाम सर्व पापांचा नाश करायला समर्थ असते. आपण ते आवडीने, तळमळीने, भावाने घेत नाही, त्यात नामाचा काय दोष ? नामाची भावना वाढविणे हीच उपासना. एखाद्या आईला सांगितले की, ' तू मुलाला जवळ ठेव पण त्याच्यावर प्रेम करू नकोस, ' तर ते जसे शक्य नाही, त्याप्रमाणे नाम घेणाराला सत्कर्म टाळू म्हटले तरी टाळता येणार नाही. एकवेळ भजनाला देहबुद्धीची झळ लागेल, पण नामाला ती नाही, हे लक्षात ठेवावे. मरणाच्या मागे स्मरणाचा ससेमिरा लावून ठेवावा, म्हणजे मरणाची भीती नाहीशी होईल. खरोखर, भगवंताच्या नामाची तळमळ मनापासून लागायला हवी. तेरा कोटी जपामध्ये अंतःकरणाची तळमळ ही जास्त उपयोगी पडते, यात शंकाच नाही. भगवंतापासून वेगळे न राहणे, त्याचे विस्मरण होऊ न देणे, त्याच्या स्मरणात राहणे, त्याच्या नामात राहणे, यातच खरे समाधान, शांती आणि सुख आहे. खरे सांगतो मी, मनुष्याने जन्माला येऊन एकच करावे : आपण नामात राहावे आणि दुसऱ्याला नामास लावावे. संसारात न्यून पडू देऊ नये, पण भगवंताला विसरू नये, भगवंताच्या स्मरणात स्वतःस विसरावे. सर्वांभूती नम्र होणे हाच अभिमान घालविण्याचा उपाय होय. इतर साधनांनी जे साधायचे ते नुसत्या अनुसंधानाने साधते हाच या युगाचा महिमा आहे. मायेने आपल्यावर विषयास्त्र सोडले की आपण त्यावर भगवंताच्या नामाचे अस्त्र सोडावे, म्हणजे विषय आपोआप नाहीसा होईल.

***




## श्री संत ज्ञानेश्वर
### अभंग व अर्थ

अभंग ३०


निळें हें व्योम निळें हें सप्रेम ।
निळेपणें सम आकारलें ॥१॥
नीळवर्ण ब्रह्म नीळवर्ण कर्म ।
नीळवर्ण आश्रम गुरु देखे ॥ध्रु०॥
निळेपणें वर्तो नीळेपणें खातों ।
निळपण पाहातो निळे पणें ॥२॥
ज्ञानदेव आला नीळवर्ण शाळा ।
निळे पण गोंवळा रातलीये ॥३॥

अर्थ:-

त्या परमात्म्यावरिल प्रेमामुळे त्याचे निळेपण घेऊन आकाश आकारले असुन सर्व जग ही निळेपण घेऊन सम झाले आहे. त्या परब्रह्माचा निळावर्ण पाहुन भक्त आपली कर्मे ही नीळस्वरुपातच करत आहेत व त्यामुळे तो आश्रम ही निळा झाला आहे. सर्व अन्न निळेच वाटत आहे. निळेपणेच प्रगट वर्तत आहे व पाहायला गेले तर सर्वत्र निळेपणच दिसत आहे. त्या निळेपणात मी रंगुन गेल्याने त्या परब्रह्माच्या निळेपणात मी लीन झालो आहे असे माऊली सांगतात.



दासबोध स्तवन



उज्वला धर्माधिकारी,
पुणे, मो. ७५८८२ ३५६४६

## बध्दमुक्तनिरूपण

ज्योतिर्मय साहित्य

(दशक ७ समास ६)

आत्मस्वरूपाचे वर्णन करण्यासाठी सारासार विचार करावा लागतो. तो विचार शब्दांत मांडता यावा लागतो. त्यासाठी ग्रंथाचे वाचश मनन चिंतन करावे लागते. चूक असेल तर ते सोडून द्यावे लागते. कारण चुकीच्या गोष्टींना वेद, ऊपनिषदामध्ये अजिबात थारा नाही. सतत सत्याश्रयाचा आधार घ्यावा. विषय समजून देण्यासाठी चराचर विश्व शोधून योग्य द्रुष्टांत द्यावे लागतात. मी दासबोधाचे लिखाण करण्यासाठी प्रा.के.वी. बेलसरे सरांचा दासबोध संदर्भ ग्रंथ घेतला आहे त्यासाठी मी मा, बेलसरे सरांची शतशः ऋणी आहे.

आत्मस्वरूपाचे वर्णन करण्यासाठी सारासार विचारांची बैठक तयार असलीच पाहिजे. मुक्त पुरूष अध्यात्म विषय सांगताना क्षणभर ब्रम्हाकार होतो. थोडावेळ आपल्या अवतीभोवती च्या जगाला विसरतो. विश्व शोधतो आणि आपले लिखाण अनेक योग्य उचित द्रुष्टांतांनी सहजसुंदर बनवतो. स्वतः शुकाने एवढा मोठ्ठा भागवत ग्रंथ सांगितला त्याच्या जवळ ब्रम्हाचे ज्ञान होते.

थोडक्यात काय तर नुसते रात्रंदिन पडून न रहाता चालता बोलता व्यवहार करता, सद्गुरूंच्या विचारसरणींवर जीवनातील कर्मे केली, त्यांच्या ज्ञानकलेवर चालले तर सायुज्यमुक्ति प्राप्त होऊ शकते.



## आरोग्य संजीवनी

## थंडीत फक्त ५ मिनिटं गरम पाण्यात पाय घालून बसा

ज्योतिर्मय साहित्य

पाय गरम पाण्यात बुडवून ठेवणं हा उपाय सोपा वाटू शकतो पण शरीराला याचे बरेच फायदे होतात. आपले पाय दिवसभर आपल्या शरीराचा भार उचलतात, तसंच पायांनी आपण तासनतान उभं राहतो, चालतो. अशा स्थितीत शरीरासोबतच मनाला शांती मिळणंही गरजेचं असतं. नियमित याचा वापर केल्यानं अनेक आजारांपासून बचाव होतो.

गरम पाण्यात पाय ठेवल्यानं ब्लड सर्क्युलेशन चांगले होते, ताण-तणाव कमी होतो, थकवा दूर होतो. सेल्फ केअर रुटीनमध्ये या पद्धतीचा समावेश करू शकता. ज्यामुळे शरीराची हिलिंग प्रोसेस व्यवस्थित होईल. जर झोपताना तुमच्या पायांमध्ये वेदना होत असतील तर तुम्ही गरम पाण्यात पाय ठेवू झोपू शकता. ज्यामुळे तुमच्या पायांच्या नसांना आराम मिळेल आणि झोपही चांगली येईल.

पाय गरम पाण्यात ठेवल्यानं काय होतं?

गरम पाण्यात पाय बुडवून झोपल्यानं शरीराचं तापमान थोडं वाढते ज्यामुळे रक्तप्रवाह व्यवस्थित होतो. ज्यामुळे पायांच्या नसांमध्ये वेदना, ताण - तणाव कमी होतो. तर तुम्हाला दीर्घकाळ उभं राहण्याचं काम करायचं असेल तर ही हिलिंग थेरेपी तुमच्यासाठी फायदेशीर ठरू शकते. गरम पाणी तुमच्या मांसपेशींना रिलॅक्स करते याशिवाय थकवा गायब करते.

गरम पाण्यात पाय ठेवणं का फायदेशीर

पायांमध्ये पायांमध्ये सूज, वेदना होत असतील ही समस्या टाळता येऊ शकते. ज्यामुळे ताण-तणाव कमी होतो. कारण पायांना आराम दिल्यानं संपूर्ण शरीरावर याचा परिणाम होतो. हिवाळ्याच्या दिवसांत जर तुमचे पाय थंड राहत असतील तर ते गरम करण्यासाठी तसंच रक्त संचार ठीक करण्यासाठी ते फायदेशीर ठरू शकते.

गरम पाण्यात मोठे मीठ दोन चमचे. कापूर. (तीन ते चार वड्या) अर्धा लिंबू घालून पाय ठेवण्याचे फायदे

१. मिठामुळे सूज व वेदना कमी होते

मीठ मिसळल्यामुळे गरम पाण्याचा परीणाम अधिक वाढतो. मिठातील मॅग्नेशियम आणि अन्य खनिजं त्वचेला आराम देतात तसंच सूज कमी करण्यास मदत करतात. यामुळे डिटॉक्सिफिकेशन मध्येही मदत होते. खासकरून पायांवर दुर्गंध येत नाही. मीठाचं पाणी पायांसाठी फायदेशीर ठरते. एप्सम सॉल्ट, सैंधव मिठाचा वापर उत्तम मानला जातो. रोज थंडीत गरम पाण्यात मीठ घालून २० मिनिटं पाय यात ठेवा. ज्यामुळे पायांना वेदनांपासून आराम मिळेल. तसंच पायांना भेगासुद्धा पडणार नाहीत.

२. कापूरामुळे उबदारपणा व वेदना कमी

कापूर शरीराला उब मिळवून देतो, स्नायूंचा ताठरपणा कमी करतो.

बधिरपणा, झिणझिण्या किंवा थंडीमुळे आलेली कमी होते.

३. लिंबूमुळे स्वच्छता व टॉक्सिन काढणे (डिटॉक्स फीलिंग)

लिंबूचे गुण पायाची त्वचा स्वच्छ करतात,

दुर्गंधी कमी करतात, फंगल इन्फ ेक्शनचा धोका कमी करतात, ताप आल्यानंतर गरम पाण्यात पाय ठेवल्यानं काय फायदे मिळतात.

ताप आल्यनंतर पाय गरम पाण्यात ठेवणं हा जुना उपाय आहे. ज्यामुळे शरीराचं तापमान संतुलित राहतं तसंच ताप हळूहळू कमी होऊ लागतो. तसंच शरीराच्या नसा सक्रिय होता. शरीराची ऊर्जा स्थिर राहते.

संकलन -
डॉ. प्रमोद ढेरे (निसर्ग उपचार तज्ञ)
पिंपरी-चिंचवड, पुणे.
आरोग्यविषयक व्याख्याते व लेखक
संपर्क - ९२ ७१ ६६९ ६६९



## लघु बोधकथा

♦इंद्रियांवर ताबा♦

एक महात्मा रस्त्यातून घरी चालले होते. वाटेत त्यांना एक लिंबू विक्रेता दिसला. लिंबे रसाळ आणि ताजी होती. महात्म्याच्या तोंडाला पाणी सुटले. लिंबे खरेदी केली पाहिजेत असे त्यांना वाटले. त्यांनी लिंबाना निरखून पाहिले, ती स्वादिष्ट आहेत काय याचीही चौकशी केली पण जिभेच्या या चोचल्याचा मनाने धिक्कार केला. लिंबू पाहून तोंडाला पाणी सुटणे हा एक प्रकारचा लोभ आहे आणि तो साधनेच्या कार्यात अडथळा निर्माण करतो. महात्मा पुढे गेले परंतु त्यांचा जिभेचा शौक हार मानत नव्हता. त्यांची जीभ लिंबांचा स्वाद घेण्यासाठी आसुसली होती. ते परत लिंबूवाल्याकडे आले. त्याच्याकडील लिंबे निरखून पाहू लागले. परत एकदा मनाने धिक्कार केला आणि हातातील लिंबू खाली टाकून महात्मा परतले. चार पावले पुढे गेल्यावर परत एकदा त्यांच्या मनाने उचल खाल्ली आणि ते परत लिंबूवाल्याकडे आले. लिंबूवाला त्यांचे हेलपाटे पाहून आश्चर्यचकित झाला. त्याला हे कळेना की हे महात्मा सारखे का हेलपाटे मारत आहेत. यांना खरेच लिंबू खरेदी करायचे आहे की नुसतेच पाहत आहेत. शेवटी न राहवून त्याने विचारले,"महाराज, तुम्हाला जर लिंबे खरेदी करायची असतील तर अवश्य करा ना पण नुसतेच हेलपाटे का मारत आहात." शेवटी महात्म्यांनी दोन लिंबे खरेदी केली आणि घरी आले. घरी येताच त्यांनी पत्नीला चाकू मागितला. लिंबांचे दोन तुकडे केले. जसा पहिला लिंबाचा तुकडा तोंडाजवळ आणला तसा मनाने टोमणा मारला,"वा रे वा महात्माजी, तू तर या जिभेचा गुलाम झाला. जीभ जशी नाचवेल तसा तू नाचायला लागला. ती जे खायला मागेल तसा तू तिला खायला द्यायला लागला. आता तुझी साधना ही विषयांकडे चालली आहे." तितक्यात त्यांची पत्नी तिथे आली व तिने पतीचा तोंडाजवळ थबकलेला हात पाहून विचारले,"अहो, लिंबाचा स्वाद घेता घेता का थांबलात." महात्म्यांनी ते कापलेले लिंबू आणि उरलेले अर्धे लिंबू दोन्हीही पत्नीच्या हातात देऊन तिला सांगितले," मी आता हे खाणार नाही कारण आता मी जीभेवर विजय मिळवला आहे. आता मला विश्वास पटला आहे की मी इंद्रियावर ताबा ठेवू शकतो."

तात्पर्य - इंद्रियांवर ताबा ठेवता येणे ही फार मोठी साधना आहे.

# तेंडुलकर नावाचे वादळ..

ज्योतिर्मय साहित्य

ग्रंथाली वाचक चळवळीचे काम करत असताना विजय तेंडुलकर यांची भेट झाली आणि त्यानंतर आयोजित तेडुलकरांची संवाद यात्रेमध्ये आमच्या ग्रंथाली केंद्र जामनेर चा समावेश होता. त्याप्रसंगी विजय तेंडुलकर, ना. धों. महानोर, अरुण साधू, संजीव खांडेकर, ही मंडळी उपस्थित होती. तेंडुलकरांनी जमलेल्या रसिक आणि वाचकांची संवाद साधला. त्या सुमारास त्यांना पद्मभूषण हा पुरस्कार मिळाला होता. त्यानंतर एक दोन वेळा मुंबईला त्यांच्या घरी जाणे झाले त्यावेळेला त्यांनी चौकशी केली होती. मी एका धार्मिक मासिकात लिहितो हे त्यांना समजले होते. गणानाम् त्वां हे गजानन महाराजांच्या विषयी निघणारे मासिक होते. तेव्हा गप्पा गोष्टीत ते मला म्हणाले चांगले आहे. त्याच्याबरोबरच आपल्या आजूबाजूला समाजात अनेक गोष्टी घडतात आपण त्या बघतो, पण ते टिपण्याचा प्रयत्न करत नाही. अशा मनाला खटकणाऱ्या गोष्टी आपण शब्दातून मांडायला शिकले पाहिजे असे त्यांनी मला सांगितले होते.

विजय तेंडुलकरांचा जन्म ६ जानेवारी, १९२८ रोजी मुंबई येथील मुगभाट, गिरगांव येथला. त्यांचे वडील धोंडोपंत तेंडुलकर हे स्वतः लेखक, प्रकाशक आणि हौशी नट होते. या कौटुंबिक पार्श्वभूमीतून तेंडुलकरांवर संस्कार होत गेले. दि.बा. मोकाशी, वि.वि. बोकील, अनंत काणेकर, शिवरामपंत वाशीकर यांनी लिहिलेल्या साहित्याच्या वाचनातूनही मनाची घडण झाली.

तेंडुलकरांचे शिक्षण मॅट्रिकपर्यंत झाले. त्या काळात चालू असलेल्या भारतीय स्वातंत्र्य चळवळीत ते सहभागी झाले. साहजिकच या कालखंडात विविध विचारसरणींशी त्यांचा जवळून परिचय झाला. त्यांचे वास्तव्य पुणे आणि मुंबई असे होते. लेखिका आणि अभिनेत्री प्रिया तेंडुलकर ही त्यांची मुलगी..

एक लेखक,पत्रकार, वृत्तपत्रव्यवसायी, लघुकथालेखक, लघुनिबंधकार,प्रसिद्ध नाटककार, नव्या रंगभूमीचे प्रमुख आधारस्तंभ म्हणून ते परिचित होते.

''श्रीमंत'' हे त्यांचे रंगभूमीवरील पहिले नाटक पण ''गृहस्थ'' हे तेंडुलकर यांनी लिहिलेले पहिले नाटक हेच नाटक पुढे त्यांनी कावळ्याची शाळा या नावाने लिहिले. पुनर्लेखन केले.

सुरुवातीच्या नाटकांपासूनच माणसाच्या जीवनाचा, त्यांच्यात असलेल्या विकारांचा, एकटेपणाचा वेध घेण्याचा त्यांचा प्रयत्न होता.. विशिष्ट तत्त्वज्ञानाचा आणि विचारसरणीचा ठसा नाकारून तेंडुलकर मनस्वीपणे लिहीत गेले.

मुंबईतील वास्तव्यामुळेच तेंडुलकरांचा प्रयोगशील रंगभूमीशी व 'रंगायन', 'आविष्कार', 'भारतीय विद्या भवन कला केंद्र', 'अनिकेत' यांसारख्या नवनाट्याविषयी आस्था बाळगणाऱ्या संस्थांशी व त्यांतील कार्यकर्त्यांशी जिव्हाळ्याचा संबंध आला. रंगभूमीशी आंरभापासूनच आत्मीयतेने निगडित असूनही तेंडुलकरांनी नाटकांकडे व्यावसायिक दृष्टिकोणातून पाहण्याचे कटाक्षाने टाळले.


शांतता! कोर्ट चालू आहे यासारख्या नाटकातून समाजाला प्रसंगी बंडखोर वाटणारा विषय

तो ही त्यांनी निवडला.. सखाराम बाईंडर मध्ये हाताळलेला स्फोटक विषय आणि घाशीराम कोतवाल मध्ये हाताळलेला एक वेगळा विषय. त्यामुळेच नव्या-जुन्या कलावंतांना तेंडुलकरांनी लिहिलेल्या नाटकांचे आव्हान पेलण्याची ओढ सातत्याने राहिली. आणि त्याकडे ते आकर्षित होत गेले. सखाराम बाईंडर नाटक सुरू असताना कसे कसे अनुभव आले याविषयीचे बाईंडरचे दिवस हे पुस्तक सुद्धा प्रसिद्ध झाले आहे. कमलाकर सारंग यांनी लिखाण केलेले आहे.

ललित लेखनात त्यांनी-कोवळी उन्हे, रातराणी, फुगे साबणाचे, रामप्रहर, हे सर्व कोठून येते? लिखाण केले.

संपादनात - दिवाकरांच्या नाट्यछटा, समाजवेध.

तेंडुलकरां विषयी किंवा त्यांच्या



लेखनाविषयी लिहिली गेलेली पुस्तके-अजून तेंडुलकर (संपादिका :




रेखा इनामदार-साने)

तेंडुलकर : असेही तसेही (मुकुंद टाकसाळे)

तेंडुलकर आणि हिंसा (माहितीपट : निर्माते - अतुल पेठे)

तेंडुलकरांची नाटके (डॉ. चंद्रशेखर बर्वे.)

पुण्यात अनेक व्याख्यानमाला होत असतात, त्यांत विजय तेंडुलकर स्मृती व्याख्यानमालाही होत असते.

माणूस नावाचे बेट, मधल्या भिंती, सरी गं सरी, एक हट्टी मुलगी, अशी पाखरे येती, गिधाडे, छिन्न आदी नाटके रूढ सामाजिक संकेतांना, तसेच नाट्यसंकेतांना हादरा देणारी आणि वादग्रस्त ठरली. मानवी वृत्तीतील कुरूपता, हिंस्रता यांचे भेदक, पण वास्तववादी उग्र,.कठोर, चित्रण असल्याने या नाट्यकृती गाजल्या. त्यावर वाद झालेत. आणि न्यायालयीन संघर्ष झाला. आशय आणि तंत्रदृष्ट्या असणारी विलक्षण विविधता, हे त्यांचे वैशिष्ट्य ठरले.

तेंडुलकरांनी चित्रपट माध्यमही नाटकांच्याच ताकदीने हाताळले. सामना, सिंहासन, आक्रीत, उंबरठा, अर्धसत्य, आक्रोश, आघात, सरदार,इत्यादी चित्रपटांच्या पटकथा त्यांनी लिहिल्या. स्वयंसिद्धा या दूरचित्रवाणी मालिकेचे लेखनही त्यांनी केले. तसेच नितळ या चित्रपटात त्यांनी भूमिका ही केली आहे.

मानवी मनाचे, त्यातही त्याच्या कुरूपतेचे चित्रण करून अशा व्यक्तिरेखांना समजून घेण्यात, त्यांचे जीवन आपल्या लिखाणात मांडताना मानवी नात्यातील संबंध, त्यातील ताण, त्या अनुषंगाने व्यवस्थांचे बंदिस्तपण टिपले आहे.

काव्य-कारुण्य, व्यक्ती-समाज, वास्तव-फॅन्टसी यांची कलात्मक सरमिसळ त्यांच्या नाटकांत आढळते. नवनाट्य, वास्तववाद यांच्याशी त्यांच्या लेखनाचे आंतरिक नाते दिसते. तरीही त्यांच्यावर कोणताही शिक्का मारता येत नाही इतकी प्रयोगशीलता दिसते.

''देशातील वाढता हिंसाचार'' या विषयाच्या अभ्यासासाठी त्यांना १९७३-७४ मध्ये नेहरू शिष्यवृत्ती मिळाली होती.

त्यासाठी त्यांनी हिंसा हा विषय घेतला होता. त्यावेळी त्यांनी जेल, फाशीची शिक्षा जाहीर झालेली गुन्हेगार, फिरोज दारूवाला हत्याकांड असे अनेक फोटो टिपले होते. अजूनही त्यांचा एक चेहरा होता तो म्हणजे छायाचित्रण. नॅचरल फोटो काढण्याकडे त्यांचा कल होता. पोज दिलेली त्यांना आवडत नव्हते. १९७९ ते ८१ दरम्यान त्यांनी ''टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सेस'' या संस्थेत अभ्यागत प्राध्यापक म्हणूनही काम केले. नवनाट्याविषयी आस्था बाळगणाऱ्या संस्था आणि त्यातील कार्यकर्त्यांबद्दल त्यांना जिव्हाळा होता.

त्यांनी साहित्यातलेअनेक प्रकार हाताळले होते....

एकांकिका - अजगर आणि गंधर्व, थीफ : पोलिस, रात्र आणि इतर एकांकिका; समग्र एकांकिका (भाग १ ते ३)

कथा - काचपात्रे, गाणे, तेंडुलकरांच्या निवडक कथा, द्वंद्व, फुलपाखरू, मेषपात्रे.

कादंबरी - कादंबरी एक, कादंबरी दोन, मसाज.

चित्रपटांच्या पटकथा - अर्धसत्य, आक्रीत, आक्रोश, उंबरठा, कमला, गहराई, घाशीराम कोतवाल, चिमणराव, निशांत, प्रार्थना, २२ जून १८९७, मंथन, ये है चक्कड बक्कड बूम्बे बू, शांतता कोर्ट चालू आहे, सामना, सिंहासन, सरदार.ई. .

टॉक शो - प्रिया तेंडुलकर टॉक शो.

दूरचित्रवाणी मालिका - स्वयंसिद्धा.

नाटके - अजगर आणि गंधर्व, अशी पाखरे येती, एक हट्टी मुलगी, कन्यादान, कमला, कावळ्यांची शाळा, कुत्रे, गृहस्थ, गिधाडे, घरटे अमुचे छान, घाशीराम कोतवाल, चिमणीचं घर होतं मेणाचं, चिरंजीव सौभाग्यकांक्षिणी, छिन्न, झाला अनंत हनुमंत, त्याची पाचवी, जंबद्वीपचा मुकाबला,देवाची माणसे, नियतीच्या बैलाला, पाहिजे जातीचे, फुटपायरीचा सम्राट, भल्याकाका, भाऊ मुरारराव, भेकड, बेबी, मधल्या भिंती, माणूस नावाचे बेट, मादी (हिंदी), मित्राची गोष्ट, मी जिंकलो मी हरलो, विठ्ठला, शांतता! कोर्ट चालू आहे, श्रीमंत, सखाराम बाईंडर, सफर, सरी गं सरी.

नाट्यविषयक लेखन - नाटक आणि मी.

बालनाट्ये - इथे बाळे मिळतात, चांभारचौकशीचे नाटक, चिमणा बांधतो बंगला, पाटलाच्या पोरीचे लगीन, बाबा हरवले आहेत, बॉबीची गोष्ट, मुलांसाठी तीन नाटिका, राजाराणीला घाम हवा.

**(क्रमशः)**

# 'वाचनं ज्ञानदं बाल्ये तारुण्ये शीलरक्षकम् ।

ज्योतिर्मय साहित्य

(मागील अंकावरून)

माझे वडील माजी सैनिक आहेत, त्यांनी भारतीय लष्करात सेवा बजावली आहे. माझे बालपण गावातच आई आणि दोन लहान भावंडांसोबत गेले. माझे वडील जेव्हा सुट्टीवर यायचे, साधारणपणे वर्षातून एका महिन्यासाठीतेव्हा ते माझ्यासाठी एक डायरी आणायचे. ते मला सांगायचे की दररोज एक तरी इंग्रजी शब्द त्या डायरीत लिही, जेणेकरून वर्षाकाठी किमान १०० नवीन शब्द माझ्या शब्दसंग्रहात जमा होतील. जरी त्यातील ३०% शब्दच माझ्या लक्षात राहिले तरी चालेल. पण गंमत अशी की, आठवडाभरानंतर मला कुठल्याच शब्दाचे स्पेलिंग आठवत नसे. कदाचित तेव्हाच मला समजले की पाठांतर करणे (लर्निंग बाय हार्ट) ही माझी ताकद नाही. मला कविता किंवा पाढे कधीच एक-दोन दिवसांपेक्षा जास्त काळ लक्षात राहिले नाहीत. अगदी आजही, इंजिनिअरिंगची पदवी आणि एआय व मशीन लर्निंग मध्ये पीजी डिप्लोमा पूर्ण केल्यानंतरही, मला १२ च्या पुढे पाढे येत नाहीत. मग तुम्ही विचाराल, १३ चा पाढा पाठ नसतानाही मी माझ्या करिअरमध्ये यशस्वी कसा झालो? याचे उत्तर व्यावहारिक ज्ञान (प्रॅक्टिकल नौलेज) आणि गोष्टी कशा काम करतात हे समजून घेण्याच्या कुतूहलामध्ये दडलेले आहे.

माझे बहुतांश शिक्षण मराठी माध्यमातून झाले आहे.मी त्या शिक्षकांचा खूप ऋणी आहे ज्यांनी माझ्यातील क्षमता ओळखली आणि मला पुढे जाण्यास मदत केली. शाळेतील आणि गावातील वातावरणामुळे मला कृतीतून शिकण्याची सवय लागली. लोकमंगल हायस्कूल मध्ये जमदाडे या शिक्षकांनी माझी चित्रकला पाहून मला चित्रकला ग्रेड परीक्षांना बसण्यासाठी प्रोत्साहन दिले. ज्यामुळे मला शाळेच्या पलीकडील जगाची ओळख झाली. दुसऱ्या एका शिक्षकांनी माझे हस्ताक्षर पाहून मला फळ्यावर सुविचार आणि नोट्स लिहायला सांगितले, ज्यामुळे वर्गासमोर उभे राहण्याचा माझा आत्मविश्वास वाढला. ही तर फक्त सुरुवात होती.आज मी ज्या करिअरमध्ये आहे, त्याचा पाया तिथेच रचला गेला.

मला आजही माझे शाळेचे दिवस, विशेषतः लोकमंगल हायस्कूलमध्ये २००६,२००७ आणि २००८ ही घालवलेली तीन वर्षे आठवतात. ती वर्षे उपक्रम आणि शिक्षणाने भरलेली होती. तिथे गेल्यानंतर माझ्यात खरे बदल घडू लागले. शाळेत वर्षभर विविध स्पर्धा आणि मान्यवर व्यक्तींची



व्याख्याने आयोजित केली जात असत. संस्थेचे अध्यक्ष शिरीष चिटणीस व्याख्यानासाठी शाळेत वक्ते घेऊन येत असत.एका प्रसंगाने मला खूप मोठा धडा दिला, तो म्हणजे वार्षिक पाककला स्पर्धा. अनेक विद्यार्थ्यांनी सुंदर सजवलेले आणि अवघड पदार्थ बनवून आणले होते. पण माझा मित्र राकेश याने काहीतरी वेगळेच केले. त्याने फक्त स्वतःचा डबा (टिफिन), जो तो घरून जेवणासाठी आणला होता, तोच स्पर्धेत सादर केला. आणि काय आश्चर्य? त्याला पहिला क्रमांक मिळाला. तो क्षण माझ्या मनावर कोरला गेला.सर्वोत्तम आणि प्रामाणिक कामाला नेहमीच यश मिळते. तुम्हाला दिखावा करण्याची गरज नसते. तुमचा खरेपणा आणि प्रामाणिकपणा स्वतःच बोलतो.

आणखी एक आठवण म्हणजे २००६ मध्ये, जेव्हा मी इयत्ता आठवीत होतो, तेव्हा डॉ. दत्तप्रसाद दाभोळकर यांचे व्याख्यान झाले होते. त्यांनी आम्हाला एक साधा प्रश्न विचारला: ''पाण्याने आग का विझते?'' मला तेव्हा उत्तर माहित नव्हते, पण नंतर मला समजले की याचे उत्तर देण्यासाठी आग कशी लागते आणि पाणी कसे काम करते हे समजून घेणे आवश्यक आहे. आणि हे केवळ पुस्तकी पाठांतराने शिकता येत नाही. गोष्टी कशा काम करतात हे समजून घेणे गरजेचे असते. याच दृष्टिकोनामुळे मला ९ वी मधील ज्यूल्स लॉ आजही आठवतो, कारण तो मी पाठ केला नव्हता, तर समजून घेतला होता.

या शाळेने दरवर्षी माझा आत्मविश्वास वाढवला आणि दहावीत असताना एक मोठा क्षण आला. तीन वर्षांतील माझी प्रगती, शिकण्याचे प्रयत्न आणि माझा व्यावहारिक दृष्टिकोन पाहून शाळेने मला २००८ सालचा आदर्श विद्यार्थी पुरस्कार दिला. हा पुरस्कार पूर्णपणे अनपेक्षित होता. वर्गातील सर्वांना, अगदी मलाही वाटत होते की हा पुरस्कार त्या हुशार मुलाला मिळेल जो शिक्षकांचा लाडका होता आणि ज्याचा तीनही वर्षे पहिला नंबर येत असे. संपूर्ण वर्ग त्याचेच नाव घेऊन ओरडत होता. आणि अचानक नाव पुकारले गेले''सावंत प्रशांत जनार्दन.'' प्रत्येकाला आश्चर्य वाटले.मला तर दुप्पट धक्का बसला होता. पण जेव्हा शिक्षकांनी मला हा पुरस्कार का दिला याचे कारण सांगितले, तेव्हा माझा आत्मविश्वास गगनाला भिडला आणि खात्री पटली की मी योग्य मार्गावर आहे. त्यानंतर मी कधीच स्वतःबद्दल शंका घेतली नाही. मला वाटते की हेच माझ्या यशाचे दुसरे रहस्य आहेआत्मविश्वास.



शिरीष चिटणीस
सातारा मो. 75888 65051

माझ्या मते, व्यावहारिक ज्ञान आणि गोष्टींचे कार्य समजून घेणे याला जगात खूप किंमत आहे. जेव्हा तुम्ही इंडस्ट्रीमध्ये काम करायला जाता, तेव्हा कोणीही तुमचे कॉलेज किंवा डिग्रीची टक्केवारी विचारत नाही. त्यांना फक्त हेच बघायचे असते की तुम्हाला किती ज्ञान आहे आणि काम पूर्ण करण्याची तुमची जिद्द किती आहे. माझी इंजिनिअरिंगची डिग्री हे याचे उत्तम उदाहरण आहे. मी ज्या कॉलेजमधून इंजिनिअरिंग केले ते आज अस्तित्वातही नाही, आणि जेव्हा होते तेव्हाही ते फारसे प्रसिद्ध नव्हते. तरीही मी उत्तम शिक्षण घेऊ शकलो कारण,मला तिथल्या प्रॅक्टिकल विषयांमध्ये मनापासून रस होता. इंजिनिअरिंगमध्येही मी थेअरी विषयांत काठावर पास व्हायचो, पण जिथे तांत्रिक विषय असायचे तिथे मला पैकीच्या पैकी गुण मिळायचे.

इंजिनिअरिंगनंतर, मी ऑटोमोटिव्ह क्षेत्रातील एका स्टार्टअपमध्ये काम करण्याचा प्रयत्न केला. मी आणि माझ्या मित्रांनी कारसाठी एक सेन्सर बनवला जो पावसाच्या तीव्रतेनुसार आपोआप वायपर सुरू करायचा आणि त्याचा वेग नियंत्रित करायचा. तो एक रंजक प्रकल्प होता, पण मला त्या क्षेत्रात जास्त वाढ दिसली नाही, म्हणून चांगल्या संधींसाठी मी पुण्याला जाण्याचा निर्णय घेतला. सहा महिन्यांतच मला वास्तवाची जाणीव झाली.प्लेसमेंट ड्राईव्हसाठी काही जागांसाठी शेकडो मुले यायची. ते सहा महिने निराशाजनक होते. मला माहित होते की माझ्यात क्षमता आहे, पण मला माझे कौशल्य दाखवण्यासाठी योग्य व्यासपीठ मिळत नव्हते. मग मला पुण्यातील सी-डॅक () कोर्सबद्दल समजले, जिथे कॅम्पस इंटरव्ह्यूची सोय होती. मी प्रवेश परीक्षा दिली, मला हवा तो कोर्स मिळाला आणि सहा महिन्यांनंतर मगरपट्टा येथील एका छोट्या सॉफ्टवेअर कंपनीत माझी निवड झाली. अशा प्रकारे माझा आयटी () क्षेत्रातील प्रवास सुरू झाला. तिथे मी चार वर्षे काम केले, पदोन्नती मिळवली आणि शेवटी त्याच कंपनीसाठी अमेरिकेत दीर्घकाळ काम करण्याची संधी मिळाली. आता मी इथे येऊन सहा वर्षांहून अधिक काळ लोटला आहे.

मी पूर्णवेळ नोकरी करत असलो तरी, तंत्रज्ञानासोबत अपडेट राहण्यासाठी मी माझे शिक्षण चालूच ठेवले आहे. अमेरिकेत आल्यावर एआय आणि मशीन लर्निंगमधील प्रगती पाहून मी एआय/एमएल मध्ये पीजी डिप्लोमा करण्याचा निर्णय घेतला, ज्याचा माझ्या व्यावसायिक वाढीसाठी खूप फायदा झाला. सध्या मी माझ्या कंपनीत एआय एजंट डेव्हलपमेंटचे नेतृत्व करत आहे आणि दररोज काहीतरी नवीन शिकत आहे.


जेव्हा मी मागे वळून पाहतो, तेव्हा मला माझ्या कुटुंबाचा, मित्रांचा आणि त्या महान शिक्षकांचा प्रचंड पाठिंबा दिसतो जे मला या प्रवासात भेटले.


प्रशांतचे हे मनोगत विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे आहे. या शाळेत गंगाधर म्हमाणे, राजकुमार निकम,अशोक वाळिंबे,पांडुरंग शिंदे, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, कै. श्री. छ. अभयसिंहराजे भोसले, माधव राजगुरू, विश्वास दांडेकर डॉक्टर दत्तप्रसाद दाभोळकर, शैला दाभोळकर, राजेंद्र माने, मृणालिनी कानिटकर सुरेश शिंगटे, प्राचार्य रमणलाल शहा, कै,डॉ विश्वास मेहंदळे, बंडा जोशी, रवींद्र कोकरे, कै अभय देवरे आनंदराव पाटील, साहित्यिक विलास पाटील,दत्तात्रय बनकर, कै उद्धव कानडे ज्येष्ठ अभिनेते मोहन जोशी,सुनिताराजे पवार,प्रभा सोनावणे, वर्षा कुलकर्णी असे अनेक मान्यवर येऊन विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून गेले आहेत. मराठी माध्यमाच्या शाळा विद्यार्थ्यांची प्रगती होण्यासाठी आणि त्यांना पुढील आयुष्यात उंच भरारी घेण्यासाठी महत्वाचे माध्यम आहे.









# अस्वस्थ मनातील सर्जनशील ‘‘काहूरवाटा’’

**पुस्तक परीक्षण**


**डॉ. मीनाक्षी पाटील**

**ज्योतिर्मय साहित्य**

एक सर्जनशील कवयित्री व प्रकाशक म्हणून ज्या अखंड क्रियाशील आहेत त्या लता गुठे यांचा काहुरवाटा हा आठवा काव्यसंग्रह ! या काव्यसंग्रहाच्या शिर्षकातूनच लता गुठे यांच्या साहित्यिक व्यक्तिमत्त्वाचा नेमका परिचय आपल्याला होऊ शकतो. या काव्यसंग्रहातील मनोगताच्या आरंभीच त्यांनी काहूर या शब्दाचा नेमका भावार्थ स्वतःच्या अनुभूतीतून खूप प्रभावीपणे व्यक्त केला आहे. सर्जनशील मन हे कायमच एका अनामिक काहुरीने, अस्वस्थतेने, हुरहुरीने व्यापलेले असते आणि त्या भावावस्थेतूनच खरे तर नवनिर्मिती घडत असते. अशा या हुरहुरीने व्यापलेल्या मनात भावभावनांची जी असंख्य आंदोलनं दाटून येतात त्यातूनच आपल्या कवितांना वाट मिळते असे त्यांनी आपल्या मनोगतात म्हटले आहे. हजारो ओव्या मुखोद्गत असलेल्या आपल्या आईच्या प्रेरणेतूनच आपण लिहितो असं म्हणून तिला काव्यसंग्रह अर्पण करतांना आपल्या कवितेचं परंपरेशी असलेलं घट्ट नातंच त्यांनी अधोरेखित केलं आहे. त्यांच्या काव्यसंग्रहाच्या अनोख्या शिर्षकासारखीच उत्सुकता वाढवणारी शिर्षकं त्यांनी कवितांना दिली असून त्यातूनच अगदी अलगदपणे त्या वाचकाला भावाशयाच्या तळाशी घेऊन जातात. संग्रहातील पहिलीच कविता या कविता संग्रहाच्या शिर्षकाचं व संग्रहातील कवितांचं आंतरिक नातं स्पष्ट करते . कवयित्री म्हणते –

काळजाच्या आरपार
विचारांचा कोलाहल
काहुरात अडकले
किती जन्मांचे मोहळ
काहुरवाटेतले मायाजळ
दूर सारता सरेना
पाय फसले जन्माचे
गुंता काहीच सुटेना

काळजाच्या आरपार व्यापलेला जो विचारांचा कोलाहल आहे ,भावनांचा गुंता आहे त्याच्या मुळाशी जाऊन स्वतःचं आणि जगाचं नातं समजून घेण्याचा प्रयत्न कवयित्री करतांना दिसते . मनातल्या वादळांशी वाद-संवाद साधतासाधता जगण्याशी बांधिलकी जपल्यामुळे जगण्यातले सारे प्रवाह समजून घेण्याची तिची असोशी विलक्षण आहे. पण त्याचवेळी स्वतःला या विविध प्रवाहांपासून मात्र अलिप्त ठेवण्याचं कसबही तिने प्राप्त केलेले दिसते. कधी




कधी प्रवाहाच्या विरुद्ध धावावंसं वाटत असतांना जगण्याचे क्षणोक्षणी बदलणारे असंख्य चेहरे पाहून माणूसपणाचा खरा चेहरा कधी सापडेल असे काही मुलभूत प्रश्न ही कविता उपस्थित करते. हे मुलभूत प्रश्न उपस्थित करणारी ही कविता कोठेही तर्कट न होताही गंभीर आशय मात्र खूप सहज शैलीत मांडत जाते . लता गुठे या आपल्या कवितेतून कधी खूप तरलपणे अभिव्यक्त होतात तर कधी अत्यंत परखड पण संयत स्वरात समाजवास्तवाची हजेरी घेतात. आपल्या कवितांची कधी अगदी सहज संवादाने सुरुवात करताकरता हळूहळू कधी त्या कठोर नैतिक प्रश्न उपस्थित करू लागतात तेही लक्षात येत नाही. अर्थात सभोवतालचे समाजवास्तव मांडताना कुठेही अभिनिवेशी न होता अगदी सहजशैलीत वाचणाऱ्याच्या हृदयाचे तार छेडतांना त्यांच्या भाषेचं सौंदर्य अगदी खुलून येते. आपल्या कवितांमधून लहान मुलगी,तरुणी, प्रौढा, वृद्धा अशा वेगवेगळ्या वयोगटातल्या, मुलगी, आई, प्रेयसी, पत्नी अशा विविध भूमिकांमधल्या, वेगवेगळ्या स्तरांमधल्या स्त्रियांचं भावविश्व त्यांनी अत्यंत तरलतेने चितारले आहे. अशारीतीने स्त्रीभावविश्वाचे असंख्य कंगोरे व्यक्त करतांना कवयित्रीने सभोवतालच्या निसर्गातील विविध प्रतिमांचे खूपच सुंदर उपयोजन केलेले दिसते.जगण्याच्या युद्धात पदोपदी घायाळ करणारे अनुभव येतांना कशा कशावर तरी लिहावी कविता ? असं म्हणणारी कवयित्री खचलेल्या मनाला समजतच नाही कशी लिहावी कविता ? असेही एखाद्या विफल क्षणी म्हणून जाते. पण पुढच्याच क्षणी जगण्याच्या पडझडीत, अविरत संघर्षात आपल्याला शब्दांनी, कवितेनेच कसे बळ दिले असे म्हणून शब्दांचं सामर्थ्य व्यक्त करतांना कवयित्री म्हणते –

पंखाची फडफड
उडण्याची धडपड
चालूच राहिली
अव्याहत....अखंड
आणि....
शब्दांनी समृद्ध केले
आख्खे जगणेच !
किंवा
हे कविते,
तू सोबत होतीस म्हणून
आयुष्यच बदलून गेले

तर शब्दांवर, कवितेवर निरतिशय प्रेम करणारी ही कवयित्री सारं काहूर मनसोक्त पिऊन घेत सततच पूर्ण-अपूर्णापल्याड खुणावणाऱ्या वाटा शोधत राहते.

अशारीतीने काहूरात या काव्यसंग्रहातून कवयित्री लता गुठे यांच्या जगण्यातली सक्रियता,सकारात्मकता त्यांच्या कवितेतील आशय – अभिव्यक्तीतून खूपच प्रत्ययकारीरित्या व्यक्त झालेली दिसते. त्यांच्या पुढील काव्यप्रवासास खूप खूप शुभेच्छा !

***

# महाळुंगे येथे दासनवमी निमित्त मनाचे श्लोक परिवाराची प्रभात फेरी उत्साहात

**ज्योतिर्मय साहित्य**

महाळुंगे, पुणे – श्री भगवती सेवा आश्रम अंतर्गत मनाचे श्लोक परिवाराच्या वतीने दासनवमीच्या पावन पर्वानिमित्त आज सकाळी ७.०० वाजता महाळुंगे येथे भक्तिमय प्रभात फेरी उत्साहात पार पडली.

या प्रभात फेरीत इक्विलाईफ सोसायटीमधील ज्येष्ठ नागरिक, महिला तसेच शाळकरी विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला. ध्वनीक्षेपकाद्वारे मनाचे श्लोकांचे पठण करण्यात येत असल्याने परिसरात भक्तिमय आणि पवित्र वातावरण निर्माण झाले होते.

सुर्यमुखी श्री गणेश मंदिर येथून प्रभात फेरीला प्रारंभ झाला. पुढे विठ्ठल मंदिर, दत्त मंदिर, शिव मंदिर या मार्गे फेरी इक्विलाईफ सोसायटीत पोहोचली. तेथे सोसायटीचे सांस्कृतिक प्रमुख श्री. सुधीर सानियाल, श्री. राजेश बालोडे व श्री. वैभव जगताप यांनी प्रभात फेरीतील सर्व सहभागींचे स्वागत केले.

प्रभात फेरीची सांगता पुन्हा सुर्यमुखी श्री गणेश मंदिराजवळ करण्यात आली. या प्रसंगी श्री. जगदीशजी झंवर यांनी उपस्थितांचे आभार मानले




# मराठी विश्वकोश नोंद लेखन कार्यशाळा

## मराठीभाषेत ज्ञानसाधनांची निर्मिती आवश्यक-जिल्हाधिकारी दिलीप स्वामी




**ज्योतिर्मय साहित्य**

छत्रपती संभाजीनगर – विविध ज्ञान शाखांचे उच्चशिक्षण आपण इंग्रजी भाषेतून घेत असतो. या ज्ञानांची साधने ही आपल्या म्हणजेच मराठी भाषेतून असावीत. त्यासाठी सर्व विद्याशाखांचे ज्ञान हे मराठी भाषेत आणून विश्वकोश सारख्या मराठी ज्ञानसाधनांची निर्मिती आवश्यक आहे,असे प्रतिपादन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी आज येथे केले.

शासकीय ज्ञान विज्ञान महाविद्यालयात आज महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळातर्फे ‘वनस्पतीविज्ञान आणि भौतिकविज्ञान’ नोंदलेखन कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेचे उद्घाटन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हा माहिती अधिकारी डॉ. मिलिंद दुसाने, महाविद्यालयाच्या प्राचार्य डॉ. पंकजा वाघमारे अध्यक्षस्थानी होत्या. होमी भाभा विज्ञान शिक्षण केंद्राचे निवृत्त शास्त्रज्ञ विजय लाळे, शासकीय विज्ञान संस्थेचे संचालक डॉ. राजेंद्र सातपुते, डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या वनस्पतीशास्त्र विभागाचे माजी विभागप्रमुख डॉ. अशोक चव्हाण, प्रा. अरविंद धाबे, महाविद्यालयाचे माजीप्राचार्य डॉ. नवल थोरात, भौतिकशास्त्र विभागप्रमुख डॉ. बी.बी. राजेशेख, वनस्पतीशास्त्र विभागप्रमुख डॉ. सुलोचना राठोड, विश्वकोश मंडळाचे विद्याव्यासंगी सहायक रविंद्र घोडराज, डॉ. स्नेहा खोब्रागडे आदी मान्यवर उपस्थित होते.

दीपप्रजवलनाने कार्यशाळेचे उद्घाटन करण्यात आले. जिल्हाधिकारी स्वामी यांनी सांगितले की, मराठी विश्वकोश म्हणजे ज्ञानप्राप्तीचे विश्वासार्ह साधन होय. प्रत्येक संकल्पना विश्वकोशात अधिकृत मांडलेली असते. अलिकडच्या इंटरनेट युगात माहितीचे अनेक स्रोत आहेत. पण ह्या स्रोतातून मिळणारी माहिती अधिकृत असली पाहिजे. त्यासाठी ज्ञानालाआधार असावा लागतो. याशिवाय तयार केलेले ज्ञान हे सातत्याने अद्यावत केले गेले पाहिजे. नवनवीन संकल्पना, शोध, संशोधन यांचा त्यात समावेश करुन ज्ञान अद्यावतीकरण करणे आवश्यक आहे.बुद्धिला चालना देण्याचे कार्य ज्ञान करीत असते. अशी ही ज्ञानाचे साधने मराठी भाषेतून निर्माण होणे आवश्यक आहे,असेही त्यांनी यावेळी सांगितले. अध्यक्षीय समारोप प्राचार्य डॉ. पंकजा वाघमारे यांनी केला. सूत्रसंचालन रुपेश मडकर यांनी तर डॉ. सुहासिनी गेडेकर यांनी आभार मानले.

# पर्वत राज हिमालय

**ज्योतिर्मय साहित्य**

हिमालय म्हणजे केवळ पर्वतरांग नाही, तो पृथ्वीच्या मस्तकावरील तेजस्वी मुकुट आहे. अनंत काळापासून आकाशाशी संवाद साधणारा, ढगांना कुशीत घेणारा आणि पृथ्वीला स्थैर्य देणारा हा पर्वतराज जणू भारतमातेचा अढळ पहारेकरी आहे. त्याच्या हिमशुभ्र शिखरांवर सूर्यकिरण पडले की ते सोनेरी मुकुटासारखे झळकतात आणि संपूर्ण सृष्टीला पवित्र तेजाने न्हाऊन टाकतात.

हिमालयाच्या कुशीतून नद्यांचा जन्म होतो. गंगेची निर्मळ धार, यमुनेची शांत लय, ब्रह्मपुत्रेची विशाल उर्मी या सर्व नद्या हिमालयाच्या हृदयातूनच वाहत येतात. जणू हिमालय हा करुणेचा महासागर आहे आणि नद्या त्याच्या वात्सल्यपूर्ण अश्रूधारा! त्या नद्या मैदानांना सुपीक करतात, संस्कृती घडवतात आणि मानवाला जीवनदायिनी ठरतात.

हिमालय केवळ भौगोलिक रचना नाही, तर तो अध्यात्माचा उंच शिखर आहे. कैलास पर्वतावर ध्यानस्थ शिवशंकर, बद्रीनाथकेदारनाथची पवित्र तीर्थस्थळे, ऋषीमुनींच्या तपश्चर्येचे साक्षीदार असलेले अरण्य हे सारे हिमालयाला देवत्व प्राप्त करून देतात. म्हणूनच तो ‘‘देवभूमी’’ म्हणून ओळखला जातो. येथे वारा मंत्र जपतो, निसर्ग ध्यान करतो आणि शांतता आत्म्याशी संवाद साधते.

हिमालयाचे वैभव ऋतूंनुसार नवनवे रूप धारण करते. हिवाळ्यात शुभ्र चादरीत लपलेला तो मौनाची शिकवण देतो; वसंतात फुलांनी नटलेला तो सौंदर्याची उधळण करतो; पावसाळ्यात धुक्याच्या ओढणीत लपलेला तो गूढतेचे प्रतीक बनतो. प्रत्येक ऋतूत हिमालय



जणू नवीन कथा सांगतो, नवीन भाव जागवतो.

इतिहासाच्या प्रवाहातही हिमालय अढळ उभा आहे. आक्रमणांच्या वावटळींत त्याने देशाचे संरक्षण केले, तर संकटांच्या काळात त्याने धैर्याची प्रेरणा दिली. त्याची उंची मानवाला नम्रतेची जाणीव करून देते आणि त्याची स्थिरता माणसाला संयमाचा धडा शिकवते.

खरंच, हिमालय म्हणजे निसर्गाची कविता, सृष्टीचे श्वासस्थान आणि भारताच्या आत्म्याचा अविभाज्य भाग आहे. तो जितका उंच आहे, तितकाच विशाल त्याचा संदेश आहे स्थिर राहा, पवित्र रहा आणि जगाला जीवन देत राहा.

भारताला२४०० कि.मी. लांबीचा हिमालय पर्वत लाभला आहे.ज्या ज्या वेळी आपण हिमालयात ट्रीप साठी ट्रेकिंग साठी जातो .त्यावेळी तो काश्मीर हिमालय , उत्तराखंड मधील हिमालय तसेच सिक्कीमचा किंवा अरुणाचलचा हिमालय असो. हा पर्वत पाहून मन अचंबित होतं हा एवढा पृथ्वीवरचा सर्वात सुंदर आणि उंच पर्वत कसा निर्माण झाला असावा असा प्रश्न नेहमीच पडतो .



**सौ सुरेखा राजेंद्र शेजवळ**
**मा.उपशिक्षिका कन्या शाळा,**
**सातारा. फोन :9822749758**

हिमालयाची निर्मिती ही सुमारे ४ ते ५ कोटी वर्षांपूर्वी झाली आहे पृथ्वीची निर्मिती झाल्यानंतर सुरुवातीला एकच भूपट्ट होतं परंतु कालांतराने अनेक भूपट्ट निर्माण झाले सुरुवातीचे दोनच होते त्यात उत्तरेकडचा एक आणि दक्षिणेकडचा एक. इंडो-ऑस्ट्रेलियन प्लेट म्हणजे भारतीय भूमी हा दक्षिणेकडचा भूपट्ट. उत्तरेकडे सरकत युरेशियन प्लेटला धडकल्यामुळे हिमालयाची निर्मिती झाली. या टक्करीमुळे त्यांच्यातील या दोन भूपट्ट्यांच्या दरम्यान असलेल्या टेथिस समुद्राच्या तळाशी साचलेल्या गाळाचे टकरीच्या प्रचंड दाबामुळे घडी मध्ये रूपांतर (फोल्ड मौनटेन) होऊन हिमालयाची उंच शिखरे निर्माण झाली. त्यामुळेच हिमालय पर्वत हा वली पर्वत आहे . ही प्रक्रिया आजही सुरू असल्याने हिमालय अजूनही उंचावत आहे.

हिमालय दरवर्षी सुमारे अंदाजे १ सेमी वेगाने वाढत आहे. हिमालय पर्वत जगातील सर्वात तरुण वली पर्वत आहे.

उंच शिखरे : हिमालयात जगातील सर्वोच्च शिखरे आहेत, ज्यात माउंट एव्हरेस्ट (नेपाळ-चीन सीमा), के-टू (काराकोरम रांगेत), आणि कंचनजंगा (भारत) यांचा समावेश होतो .

नद्या आणि हिमनद्या : गंगा, यमुना, सिंधू, ब्रह्मपुत्रा यांसारख्या प्रमुख नद्यांचा उगम हिमालयातील गंगोत्री आणि यमुनोत्री सारख्या हिमनद्यांमधून होतो

महत्त्व: हिमालय हा भारताचा नैसर्गिक संरक्षक आहे, मान्सूनच्या वाऱ्यांना अडवून पाऊस पाडतो, आणि अनेक बहुमोल वनस्पती व प्राण्यांचे घर आहे

अशा ह्या सुंदर पर्वतातील अनेक ठिकाणे पाहण्यासाठी भारतातील आणि जगभरातील असंख्य पर्यटक नेहमीच येतात. आपणही सर्वांनी हा पर्वत आपल्या डोळ्यांनी पाहून त्याचे सौंदर्य मनात आणि हृदयात साठवून ठेवूया.

# एल्गार संमेलनासाठी गझलकार डॉ.राज रणधीर यांची निवड

**ज्योतिर्मय साहित्य**

जालना – स्व.सुरेश भट आणि वसंतराव पालेकर स्मृती प्रतिष्ठान च्या संयुक्त विद्यमाने दि.०७ व ०८ फेब्रुवारी दरम्यान अमरावती येथे तिसरे एल्गार अखिल भारतीय मराठी गझल संमेलन आयोजित करण्यात आले असून या संमेलनात जालना शहरातील सुप्रसिद्ध गझलकार डॉ.राज रणधीर यांना गझल मुशायरा साठी पाचारण करण्यात आले आहे.



अमरावती शहरातील संत ज्ञानेश्वर सांस्कृतिक भवनात होणाऱ्या गझल संमेलनात संमेलनाध्यक्ष प्रसिद्ध गझलकार वैभव जोशी , उद्घाटक डॉ.राम पंडीत , मावळते संमेलनाध्यक्ष डॉ दिलीप पांढरपट्टे आणि स्वागताध्यक्ष नाना लोढम यांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे.

रविवारी( ता.०८) सकाळी ०९.३० वा.वैभव कुलकर्णी यांच्या अध्यक्षतेखाली स्व. विजय आव्हाड स्मृती मुशायरा होणार असून महाराष्ट्रातील १५० गझलकार सहभागी होणार आहेत यात डॉ.राज रणधीर हे आपली रचना सादर करतील. या निवडीबद्दल त्यांचे साहित्य, सांस्कृतिक क्षेत्रातील मान्यवरांनी अभिनंदन केले आहे

हे जरनल संपादक व प्रकाशक संजय व्यापारी यांनी विंग बी३, फ्लॅट नं.७०१, व्हिसलिंग पाम्स हौ.सो., मानकर चौक, कस्पटे वस्ती, वाकड, पिंपरी-चिंचवड, महाराष्ट्र ४११०५७ येथून प्रकाशित केले. (पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत) E-mail-jyotirmaysahitya@gmail.com, Mob. 7743818559